ePaper

**'कॉकरोच जनता पार्टी'चं X अकाउंट भारतात ब्लॉक; BJPला मागे टाकल्यानंतर मोठी कारवाई**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)




वारकऱ्यांवरील वक्तव्य लवांडेंना भोवलं!

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार | दि. 22 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 'युरेनियमचा साठा देशाबाहेर जाणार नाही', मोजतबा खामेनींची ठाम भूमिका

# अमेरिका-इराण संघर्ष अजून चिघळणार?

**महाईन्यूज | इराण**

**इराणबरोबर शांतता करार अंतिम टप्प्यात असल्याचा दावा करणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांना धक्का देणारी एक बातमी समोर आली आहे. अण्वस्त्र कार्यक्रमावरुन सुरु असणाऱ्या वाटाघाटीतील कळीचा मुद्दा असलेल्या युरेनियमवर इराणने भूमिका स्पष्ट केली आहे. देशातील संवर्धित युरेनियमचा साठा इराणमध्येच राहिला पाहिजे, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी दिले आहेत. अण्वस्त्र निर्मितीसाठी युरेनियम अतिशय महत्वाचा मानला जातो आणि इराण सध्या शस्त्रास्त्र दर्जाच्या जवळपास पोहोचल्याने संवर्धित युरेनियम इराणमध्ये ठेवण्याची भूमिका मोजतबा यांनी घेतल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.**



युरेनियमचा साठा इराणमधून हटवला जात नाही तोपर्यंत युद्ध समाप्त होणार नाही, असे इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामीन नेतान्याहू यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. याशिवाय इराणने त्यांना मदत करणाऱ्या बंडखोरांना पाठिंबा देणे बंद करावे तसेच, क्षेपणास्त्र कार्यक्रमही रद्द करावा, या मागणीवर नेतान्याहू ठाम आहेत. इराणी सूत्रांच्या हवाल्याने रॉयटर्सने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, संवर्धित युरेनियम देशातच ठेवण्याच्या मोजतबा खामेनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत. युरेनियम दुसऱ्या देशाकडे सोपवला तर भविष्यात अमेरिका-इस्रायकडून हल्ल्याचा धोका कायम राहतो, असे सूत्रांनी रॉयटर्सला सांगितले.

शांतात चर्चा प्रगतीपथावर असल्याचा दावा ट्रम्प यांच्याकडून केला जात दरम्यान, दोन्ही देशांकडून एकमेकांवर हल्ला करण्याची धमकी देखील दिली जात आहे. अमेरिका नव्याने हल्ला करण्याची तयारी करत असल्याची भीती इराणकडून व्यक्त केली जात आहे. ट्रम्प यांनी देखील दोनच दिवसांपूर्वी हल्ल्याची भाषा वापरली होती. आखाती देशांची विनंतीवरुन हल्ला रोखल्याचे ट्रम्प म्हणाले. पाकिस्तान या चर्चेत मध्यस्थी करत असून, पाकचे लष्करप्रमुख असीम मुनीर लवकरच इराणला भेट देऊन संघर्षावर चर्चा करणार आहेत, अशी माहिती समोर आली आहे. युरेनियमच्या मुद्द्यावरून इराण आणि इस्रायल यांच्यातील तणाव आणखी तीव्र होत असल्याचे चित्र आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता चर्चांचे प्रयत्न सुरू असले तरी दोन्ही बाजूंनी माघार घेण्याची चिन्हे दिसत नसल्याने संघर्ष वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, मध्यपूर्वेतील परिस्थितीवर जगभरातील महासत्तांचे लक्ष लागले असून, आगामी काही दिवसांत या संघर्षाची दिशा स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

### ६० टक्क्यांपर्यंत युरेनियम संवर्धन केल्याचा दावा

इराणकडे युरेनियमचा साठा असल्याचा दावा वारंवार अमेरिका आणि इस्रायलकडून केला जात आहे. इराण गेल्या काही वर्षांपासून युरेनियमच्या संवर्धनाचे काम करत आहे. दरम्यान, आता इराण या युरेनियमच्या मदतीने अण्वस्त्र निर्मितीच्या जवळ पोहोचल्याचा दावा केला जात आहे. इराणच्या अण्वस्त्र निर्मिती क्षमतेबाबत वारंवार विविध दावे केले जातात. इराणने ६० टक्क्यांपर्यंत युरेनियम संवर्धन केल्याचा दावा करण्यात आला आहे. पण, इराणने सातत्याने अण्वस्त्र निर्मितीचे दावे फेटाळून लावले आहेत. मात्र, इराणच्या वाढत्या अणुकार्यक्रमामुळे मध्यपूर्वेत तणाव वाढला असून जागतिक पातळीवरही सुरक्षा आणि स्थैर्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. यामुळे अमेरिका, इस्रायल आणि पाश्चिमात्य देशांकडून इराणवर अधिक दबाव आणण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, आगामी काळात या मुद्द्यावर आंतरराष्ट्रीय राजकारण आणखी तापण्याची चिन्हे आहेत.

### युरेनियमबाबत मोजतबा यांनी स्पष्ट केली भूमिका


अमेरिका आणि इराण यांच्यात सुरु असलेल्या शांतता चर्चेत इराणचा आण्विक कार्यक्रम हा महत्वाचा मुद्दा आहे. इराणकडे कधीच अण्वस्त्र असू नये अशी अमेरिकेची भूमिका आहे. शिवाय इराणकडे असणारा संवर्धित युरेनियमचा साठा देखील आपल्याकडे सुपूर्द केला जावा अशी मागणी अमेरिकेने केली आहे. पण, मोजतबा यांनी युरेनियमचा साठा देशातच राहावा अशी भूमिका घेतल्याने दोन्ही देशांच्या चर्चेत पुन्हा गुंतागुंत वाढल्याचे चित्र निर्माण झाले आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधून संवर्धित युरेनियमचा साठा हटवला जाईल अशी हमी दिल्याची माहिती इस्रायली अधिकाऱ्यांनी रॉयटर्सला दिली आहे.

# वारकऱ्यांवरील वक्तव्य लवांडेंना भोवलं

## विकास लवांडेंना पोलिसांनी केली अटक, राजकीय वर्तुळात खळबळ

**महाईन्यूज । पुणे**

**वारकरी संप्रदायाबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत आलेले राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते विकास लवांडे यांच्यावर अखेर अटकेची कारवाई करण्यात आली आहे. अतिरिक्त सत्र न्यायालयाने दिलेला अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द झाल्यानंतर वाघोली पोलिसांनी तातडीने त्यांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणामुळे आधीच राजकीय वातावरण तापलेलं असताना, लवांडे यांच्या अटकेने आता नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हं दिसत आहेत.**



वारकरी संप्रदायात 'घुसखोरी' होत असल्याचा दावा विकास लवांडे यांनी केला होता. त्यांच्या या वक्तव्यामुळे अनेकांनी संताप व्यक्त केला होता. याप्रकरणी येरवडा येथील नलिनी आशिष वायाळ यांनी वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर लवांडे यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला.

प्रकरण न्यायालयात पोहोचल्यानंतर अतिरिक्त सत्र न्यायालयाने त्यांना 20 मेपर्यंत अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. त्याचवेळी तपास यंत्रणा आणि सरकारी पक्षाला आपली भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देशही देण्यात आले होते.

तपासादरम्यान एक महत्त्वाची बाब समोर आल्याचं सांगितलं जात आहे. लवांडे यांनी अटकपूर्व जामिनासाठी दाखल केलेल्या अर्जात स्वतःविरोधातील पूर्वीचे चार गुन्हे नमूद न केल्याचा मुद्दा सरकारी पक्षाने न्यायालयासमोर उपस्थित केला.

सरकारी वकिलांनी ही माहिती लपवण्यात आल्याचा दावा करत अंतरिम संरक्षण रद्द करण्याची मागणी केली. न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य करत लवांडे यांचा अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द केला. त्यानंतर काही तासांतच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं.

काही दिवसांपूर्वी विकास लवांडे यांनी कथित 'घुसखोरी केलेल्या वारकऱ्यांची' यादी सोशल मीडियावर प्रसिद्ध केल्याचं सांगितलं जातं. त्यानंतर त्यांच्या विरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. या वादातूनच त्यांच्यावर आळंदी परिसरात शाईफेक झाल्याची घटना घडली होती.

9 मे रोजी लोणी काळभोर परिसरात लवांडे यांच्यावर शाईफेक करण्यात आली होती. एवढंच नव्हे तर पिस्तूल दाखवून धमकावल्याचाही आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी कीर्तनकार संग्राम भंडारे यांच्यासह 14 जणांविरोधात गुन्हा दाखल झाला होता.

विकास लवांडे म्हणाले, माझ्यावर जीवघेणा हल्ला करणारे आरोपी मोकाट आहेत. वाघोली पोलीस स्टेशनचे पोलीस एका खोट्या फिर्यादीवरून कसलाही पुरावा नसताना मला अटक करण्यासाठी मला फोन न करता रात्री घरी आले. मी घरी नव्हतो. कुटुंबीयांना माझ्या अटकेबाबत निरोप दिला. कुटुंबांना घाबरवण्याचा हा प्रयत्न होता काय? असा माझा सवाल आहे. पोलीस मला फोन करू शकले असते. मी फरार नाही किंवा माफीवीर नाही. शासनाने मला जरूर अटक करावी मी पोलिसांना सहकार्य करणारा माणूस आहे. कारण मी कायदा पाळणारा माणूस आहे. कायदा हातात घेणारा माणूस नाही.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामुळे राज्यातील वारकरी संप्रदाय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. विकास लवांडे यांच्या वक्तव्यावरून राजकीय आणि धार्मिक स्तरावरही तीव्र प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने सुरू असल्याचा दावा केला आहे. दुसरीकडे, लवांडे समर्थकांनी ही कारवाई सूडबुद्धीतून होत असल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणामुळे सोशल मीडियावरही जोरदार चर्चा रंगली असून अनेकांनी आपापली भूमिका मांडली आहे. न्यायालयीन प्रक्रियेनंतर पुढील सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणात आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### राजकीय वातावरण तापणार?

लवांडे यांच्या अटकेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आक्रमक झाल्याचं दिसत आहे. पक्षाकडून ही कारवाई राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा केला जात आहे. काही नेत्यांनी कार्यकर्त्यांना वाघोली पोलिस ठाण्याबाहेर जमण्याचं आवाहन केल्याने परिसरात तणावाचं वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पोलिसांकडून अटकेमागचं अधिकृत कारण अद्याप स्पष्ट करण्यात आलेलं नसून, या प्रकरणात पुढे कोणती कायदेशीर आणि राजकीय घडामोड घडते, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

# पुणे महानगरपालिकेत 71 स्वच्छता कर्मचाऱ्यांवर चौकशीचे आदेश

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि कामकाजावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. 'पगार एका विभागातून आणि काम दुसऱ्या ठिकाणी' अशा प्रकारामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक दत्ता बहिरट यांनी महापालिकेच्या मुख्य सभेत केला. याप्रकरणी 71 स्वच्छता कर्मचाऱ्यांबाबत चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.**



महापालिकेच्या सोमवारी झालेल्या मुख्य सभेत बहिरट यांनी पॉइंट ऑफ इन्फर्मेशनद्वारे घोले रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील 71 कर्मचाऱ्यांची यादी सादर केली. संबंधित कर्मचाऱ्यांचा पगार घोले रोड क्षेत्रीय कार्यालयातून होत असला, तरी ते प्रत्यक्षात इतर क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत काम करीत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. बहिरट यांनी सभागृहात सांगितले की, घोले रोड परिसरात नियमित साफसफाई होत नसल्यामुळे अनेक भागांत घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याचे कारण दिले जाते. मात्र, प्रत्यक्षात उपलब्ध कर्मचारी इतरत्र कार्यरत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मूळ विभागातील मनुष्यबळावर अतिरिक्त ताण पडत आहे. याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांना इतरत्र काम करण्याची परवानगी कोणी दिली? त्यामागचे कारण काय होते? अधिकृत आदेश होते का? तसेच परवानगी नसल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार? असे सवालही बहिरट यांनी उपस्थित केले. याशिवाय रिक्त जागांसाठी बदली कर्मचारी का उपलब्ध करून दिले नाहीत? याचाही जाब त्यांनी प्रशासनाला विचारला.

या आरोपांनंतर महापालिका प्रशासनाने प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश दिले आहेत. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मुख्य सभेत मांडण्यात आलेल्या मुद्द्यांची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले. तसेच, इतर क्षेत्रीय कार्यालयांतही अशाच प्रकारे कर्मचारी कार्यरत आहेत का? याची माहितीही तपासली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. घोले रोड क्षेत्रीय कार्यालयातील स्वच्छतेच्या प्रश्नावरून सभागृहात चांगलीच खडाजंगी झाली. नागरिकांकडून वारंवार तक्रारी येत असून, अनेक भागांत कचऱ्याचे ढीग आणि अस्वच्छतेची समस्या गंभीर बनल्याचेही बहिरट यांनी निदर्शनास आणून दिले.

### कामकाजातील विसंगती उघड होण्याची शक्यता

या चौकशीतून स्वच्छता विभागातील मनुष्यबळ व्यवस्थापन, कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि प्रत्यक्ष कामकाजातील विसंगती उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर वारंवार प्रश्न उपस्थित होत असताना या प्रकरणाकडे प्रशासन आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# दिवाळीपूर्वी पूर्ण होणार 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'!

## कथित ६० कोटींच्या उपसूचना भ्रष्टाचार प्रकरणात "सेल्फ गोल"; पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जगातील सर्वात उंच स्मारक 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' प्रकल्पाच्या कामाला आता अधिक गती मिळणार आहे. महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत स्मारकाचे काम दिवाळीपूर्वी पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले.**



### स्मारकामुळे पर्यटनाला चालना

स्मारकाचे काम नियोजित वेळेत आणि उच्च दर्जाने पूर्ण व्हावे, यासाठी प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जात आहे. बैठकीत स्मारक परिसरातील सौंदर्यीकरण, प्रकाशयोजना आणि पर्यटकांसाठी आवश्यक सुविधा यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. भविष्यात हे स्मारक इतिहास, संस्कृती आणि प्रेरणेचे केंद्र म्हणून विकसित करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाची गाथा आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साकारण्याचे नियोजन करण्यात येत आहे. स्मारकामुळे पर्यटनाला चालना मिळून स्थानिक रोजगारनिर्मितीलाही मोठी संधी उपलब्ध होणार आहे. शिव-शंभूप्रेमींसाठी हे ठिकाण श्रद्धा आणि अभिमानाचे प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. महाराष्ट्राच्या इतिहासातील तेजस्वी अध्याय नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडणारा हा प्रकल्प भविष्यात राज्याच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक ठरणार आहे.

या प्रकल्पासाठी पालिकेतील सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय राखण्यासाठी अतिरिक्त आयुक्त-१ विक्रांत बगाडे यांची स्वतंत्रपणे नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच स्मारकाच्या उर्वरित कामासाठी 'टाईम बाउंड ॲक्शन प्लॅन' तयार करण्याचे आदेश देण्यात आले असून, आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाहीही आयुक्तांनी दिली.

मोशी-बोऱ्हाडेवाडी येथे ही शंभूसृष्टी उभारली जात आहे. यावेळी बैठकीत स्मारकाचे प्रवेशद्वार ऐतिहासिक स्वरूपात उभारण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाला साजेसं भव्य, प्रेरणादायी आणि भविष्यातील पिढ्यांसाठी स्फूर्तीस्थळ ठरणारं स्मारक पिंपरी-चिंचवडमध्ये उभारलं जात असल्याने जगभरातील शिव-शंभूप्रेमीमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

या बैठकीला अतिरिक्त आयुक्त-२ तृप्ती सांडभोर, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, माणिक चव्हाण (विद्युत), कार्यकारी अभियंता नरोटे, सल्लागार तसेच ठेकेदार संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करणारा हा प्रकल्प महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारा ठरणार आहे. मोशी-बोऱ्हाडेवाडी येथे उभारल्या जाणाऱ्या या भव्य 'शंभूसृष्टी' प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवडची ओळख जागतिक स्तरावर अधिक भक्कम होणार आहे. या स्मारकाच्या माध्यमातून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठा जनमानसापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. स्मारक परिसरात ऐतिहासिक माहिती, देखावे आणि डिजिटल प्रस्तुतीकरणाच्या माध्यमातून इतिहास जिवंत करण्याची संकल्पनाही मांडण्यात आली.

# स्वच्छतेत अव्वल पिंपरी चिंचवडसाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा; आयुक्त

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि देशातील आदर्श शहर म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी नागरिकांच्या सक्रिय सहभागाची आवश्यकता असल्याचे मत डॉ. विजय सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.**




स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत नागरिकांकडून मिळणारा अभिप्राय हा शहराच्या स्वच्छता व्यवस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वतःहून पुढाकार घेत आपला अभिप्राय नोंदवून शहराला देशात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वच्छ आणि सुंदर शहर घडविणे, ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. स्वच्छ सर्वेक्षणात नागरिकांनी दिलेला अभिप्राय शहराच्या कामगिरीचे प्रतिबिंब ठरतो. त्यामुळे प्रत्येकाने सकारात्मक सहभाग नोंदवून पिंपरी चिंचवडला देशातील स्वच्छ शहरांच्या अग्रक्रमावर नेण्यासाठी योगदान द्यावे, असे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले.

अभिप्राय नोंदविण्यासाठी नागरिकांनी https://cf.sbmurban.org या संकेतस्थळाला भेट देऊन विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड शहर अधिक स्वच्छ, हरित आणि नागरिकाभिमुख बनवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परिसरातील स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. शहराच्या विकासात नागरिकांचा सहभाग हा महत्त्वाचा घटक असून, स्वच्छ सर्वेक्षणात दिलेला प्रत्येक अभिप्राय महापालिकेसाठी दिशादर्शक ठरणार आहे. नागरिकांनी कचरा वर्गीकरण, प्लास्टिकमुक्त परिसर आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. स्वच्छतेबाबत जनजागृती वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असून, त्यामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा. शहरातील प्रत्येक नागरिकाने 'माझे शहर, माझी जबाबदारी' ही भावना जपणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. स्वच्छ शहरामुळे आरोग्यदायी वातावरण निर्माण होऊन नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

### स्वच्छता ही सामूहिक लोकचळवळ

शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि गृहनिर्माण सोसायट्यांनीही स्वच्छता मोहिमेत सक्रिय भूमिका बजावावी, असे सांगण्यात आले. नागरिकांच्या सहकार्यामुळे पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रीय स्तरावर स्वच्छतेत नवा आदर्श निर्माण करू शकते, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून ती सामूहिक लोकचळवळ बनणे आवश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले. प्रत्येक नागरिकाने ऑनलाइन अभिप्राय नोंदवून शहराच्या स्वच्छता अभियानाला बळ द्यावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> "नागरिकांचा सहभाग आणि सहकार्य हे स्वच्छता अभियानाच्या यशाचे मुख्य बळ आहे. नागरिकांनी अभिप्राय नोंदविताना शहरातील स्वच्छतेबाबतच्या उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक अभिप्राय प्रशासनाला अधिक प्रभावी नियोजन करण्यास मदत करणार असून, स्वच्छ आणि सुंदर शहर घडविण्याच्या प्रयत्नांना गती मिळेल त्याचबरोबर, शहराच्या स्वच्छता अभियानात प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय महत्त्वाचा असून, प्रत्येकाने जबाबदारीची जाणीव ठेवून सहभाग नोंदवणे आवश्यक आहे.
>
> **- डॉ. प्रदीप ठेंगल, उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**



## भूमिका

**दक्षिण भारत हा राजकीयदृष्ट्या संवेदनशील म्हणून ओळखला जातो. कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा, आंध्र प्रदेश, केरळम् ही दक्षिणेतील राज्ये. यातील कर्नाटक व तेलंगणामध्ये काँग्रेसची निर्विवाद सत्ता आहे. तर तामिळनाडूमध्ये अभिनेता विजय थलपतीच्या नेतृत्वाखाली टीव्हीके सरकारमध्ये काँग्रेस पक्ष सहभागी झाला आहे.**

# विकास आणि सामाजिक संतुलनाची परीक्षा



त्यानंतर आता केरळम्मध्ये काँग्रेस सत्तेवर आल्याने नक्कीच त्याचे परिणाम दक्षिण भारतासह देशाच्या राजकारणावर होऊ शकतात. केरळम् हे देशातील सर्वाधिक साक्षर राज्य म्हणून परिचित आहे. अशा या महत्त्वाच्या राज्यातील सूत्रे पक्षाच्या हाती येणे काँग्रेससाठी अनेकार्थांनी फायद्याचे असेल. वास्तविक, काँग्रेसमध्ये नेतृत्वासाठी राज्यात मोठी स्पर्धा होती. परंतु, आक्रमक व आश्वासक चेहरा असलेल्या सतीशन यांना पक्षाने संधी दिलेली दिसते. स्वाभाविकच त्यामुळे ज्येष्ठ नेत्यांमध्ये काहीशी नाराजी निर्माण झाली आहे. ही नाराजी दूर करतानाच पक्षातील गटबाजी रोखण्याचे आव्हान नव्या नेतृत्वापुढे असेल.

उच्च न्यायालयात वकिली करण्याचा अनुभव असलेले सतीशन हे 2001 पासून सातत्याने विधानसभेवर निवडून आले आहेत. तळागाळात राबवलेले उपक्रम, जनतेचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी घेतलेला पुढाकार, यामुळे विश्वासार्ह लोकप्रतिनिधी अशी त्यांची प्रतिमा आहे. विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी मागच्या कार्यकाळात नोंदवलेली कामगिरी तर उल्लेखनीयच. विशेषत: भ्रष्टाचाराविरोधात कठोर भूमिका घेत त्यांनी डाव्यांच्या सरकारला जेरीस आणले होते. आता त्याच सतीशन यांच्याकडे राज्याची धुरा आल्याने पारदर्शक कारभार आणि सुशासनावर त्यांना भर द्यावा लागेल.

मुख्यत: काँग्रेस नेते व विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सतीशन यांना संधी देऊन नव्या पिढीतील मतदारांमध्ये विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तो सार्थ ठरवणे सर्वस्वी सतेशन यांच्या हातात असेल. केरळम् हे देशातील निसर्गरम्य राज्य. परंतु, मागच्या काही वर्षांत देवभूमीमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे होत असून, पर्यावरणाची लांडगेतोड सुरू आहे. त्याचा परिणाम येथील निसर्गावर होताना दिसतो. अलीकडच्या काळातील ढगफुटी, भूस्खलनाच्या वाढत्या घटना हा त्याचाच परिपाक. हे पाहता विकास आणि पर्यावरण याचे संतुलन राखत राज्याची मूळ ओळख कायम ठेवण्याचे आव्हान सतीशन यांच्यापुढे असेल. रा

ज्याला पर्यटनातून मोठा महसूल मिळतो. परंतु, निसर्गावर, पर्यावरणावर गंडांतर येत असेल, पर्यटनदेखील धोक्यात येऊ शकते, याचा विचार करावा लागेल. खरे तर राज्यापुढेही कर्ज, महसुली तूट अशा आर्थिक समस्या आहेत. कल्याणकारी योजना, बेरोजगारीचा ताण आहे, असे असतानाही नव्या सरकारने महिलांसाठी मोफत बसप्रवासासारखी योजना आणली आहे. महाराष्ट्रातील लाडकी बहीणसारखी योजना असेल किंवा मोफतच्या आणखी कुठल्या राज्याराज्यातल्या योजना असतील.

## प्रासंगिक »

### कोल्हा आणि कासव

**एकदा एका जंगलात एक कोल्हा राहत होता त्याला स्वतःच्या हुशारी बद्दल गर्व होता. तो म्हणत असे, "मी सर्व प्राण्यात हुशार आहे.**

एक दिवस तो अन्नाच्या शोधात निघाला. त्याला काही मिळाले नाही. त्याला भूक सहन झाली नाही. अखेर त्याला एक कासव दिसले. त्याला खुप आनंद झाला. त्याने उडी मारून कासवाला पकडले. कोल्ह्याने कासवाचे कवच फोडण्याचा प्रयत्न केला. पण ते काही फुटेना. कासव धुर्तपणे म्हणाले, "तु मला पाण्यात का बुडवत नाहीस? म्हणजे माझे कवच मऊ होईल व मला तु सहजपणे खाऊ शकशील." भुकेने व्याकुळ झालेल्या कोल्ह्याने, काही विचार न करता कासवाला तळ्यात ढकलले.

कासव कोल्ह्याच्या हातातून सहज निसटले व आनंदाने पाण्यात पोहू लागले. ते तळ्याच्या मध्यभागी गेले आणि म्हणाले, "कोल्ह्या स्वतःला फार हुशार समजू नकोस."

तात्पर्य - जसे पेराल तसेच उगवेल किवा जशास तसे.

निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह सहा राज्यांतील विधान परिषद निवडणुकांसाठी सोमवारी आचारसंहिता लागू केली. यावेळी एक महत्त्वाचे पाऊल आयोगाने उचलले आहे.

# 'डोंगार अन् झाडी'ला ब्रेक?




या निवडणुकीत मतदारांना हॉटेल, रिसॉर्ट किंवा तत्सम ठिकाणी एकत्र ठेवणे हा लाच देण्यासारखा गंभीर गुन्हा ठरवून भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ ब नुसार कारवाई होणार आहे. एखाद्या राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण झाली की पक्षाचे आमदार, खासदार फुटू नयेत म्हणून त्यांना एखाद्या पंचतारांकित हॉटेल किंवा रिसॉर्टमध्ये ठेवण्याचे राजकारण देशात चांगलेच रुळले आहे.

‘खोक्यां’तून येणारी रक्कम, सत्ता, आणि पदे यांची आमिषं दाखवून लोकप्रतिनिधींना आपल्याकडे वळवण्यासाठी चालणारा ‘घोडेबाजार’ घडू नये म्हणून हा सारा आटापिटा. अविश्वास ठराव किंवा बहुमत चाचणी होईपर्यंत आपल्याकडील संख्याबळ टिकवून ठेवण्यासाठी सर्वप्रथम हा उपाय योजण्याचे (अप)श्रेय जाते, आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांना. १९८४मध्ये त्यांचे सरकार पाडण्याचे प्रयत्न झाले तेव्हा त्यांनी आमदारांना कर्नाटकातील रिसॉर्टमध्ये पाठवले होते.

महाराष्ट्रात २०१९ चे ऐतिहासिक ‘महाविकास आघाडी’ सरकार तयार होत असताना मंडळी मुंबईच्या पंचतारांकित हॉटेलांच्या आश्रयाला गेली होती. देशातील सगळ्यात मोठ्या रिसॉर्ट राजकारणाचा मानही महाराष्ट्राचाच! २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेविरुद्ध बंड पुकारले, तेव्हा त्यांच्या आमदारांनी ‘डोंगार, झाडी’ करत आधी सुरत, नंतर गुवाहाटी आणि अखेर गोव्यातील आलिशान हॉटेलांचा पाहुणचार झोडला होता. या ‘नजरकैदे’तल्या आमदारांना आलिशान सुविधा असतात. मनोरंजन, खानपान यांचा एकत्र आस्वाद घेतल्याने एकीची भावना भलतीच वाढत असणार! त्यामुळे फोन काढून घेतले किंवा बाहेर चौक्यापहारे बसवल्याचे दु:ख फारसे होत नसावे. या प्रकारांत लोकशाही मूल्ये वगैरे गोष्टी निवडणूक आयोग आजवर विसरला होता अन् आपण निवडून दिलेला प्रतिनिधी स्वत:ला घोडेबाजारात उभे करतो, याचा जनतेलाही विषाद नव्हता.

निवडणूक आयोगाच्या नव्या नियमामुळे यात किती बदल होतो ते दिसेलच; पण नैतिक मूल्ये गुंडाळून ठेवलेल्या नेत्यांना सामान्य मतदार जोवर पुन:पुन्हा निवडून देत राहतील तोवर रिसॉर्ट राजकारण वेगळा चेहरा घेऊन समोर येत राहील.

## ।। अभंगवाणी ।।



ओलें मूळ भेदी खडकाचें अंग ।
आभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥१॥

नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड ।
नाहीं कईवाड तोंच वरि ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सरकारचा शेतकऱ्यांचा मोठा दिलासा!

## कर्जमाफी आणि पीककर्जावर सरकारचे दोन मोठे निर्णय; बँकांना दिला आदेश

महाईन्यूज । मुंबई

**खरीप हंगाम तोंडावर असताना राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी दोन महत्त्वाचे निर्णय जाहीर करत मोठा दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे जूनमध्ये कर्जमाफीची अंमलबजावणी वेळेत करण्यासाठी हालचाली सुरू झाल्याचं स्पष्ट करण्यात आलं, तर दुसरीकडे पीककर्जासाठी शेतकऱ्यांकडून 'सिबिल स्कोअर' (CIBIL) मागण्यास स्पष्ट नकार देत बँकांना कडक शब्दांत सूचना देण्यात आल्या आहेत.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर ही माहिती दिली. बैठकीत खरीप हंगाम, बियाणे-खतांचा पुरवठा, संभाव्य दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसारख्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीची अंमलबजावणी वेळेत करण्यासाठी प्रशासनाने आता प्रत्यक्ष तयारी सुरू केल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. यासाठी बँकांसोबत चर्चा करण्यात आली असून, कर्जमाफीसाठी आवश्यक माहिती कोणत्या स्वरूपात द्यायची आणि प्रक्रिया कशी पार पाडायची यावर नियोजन सुरू आहे.

सरकारचा प्रयत्न असा आहे की, खरीप हंगाम पूर्ण वेगात सुरू होण्यापूर्वी शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळावा आणि नवीन पीककर्ज घेण्यात अडथळे येऊ नयेत.

शेतकऱ्यांसाठी सर्वात महत्त्वाची घोषणा म्हणजे पीककर्जासाठी CIBIL स्कोअरची सक्ती होणार नाही. अनेक शेतकऱ्यांकडून खराब क्रेडिट स्कोअरमुळे पीककर्ज नाकारलं जात असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या.

यावर सरकारने राष्ट्रीयकृत बँकांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की, पीककर्जासाठी कोणत्याही शेतकऱ्याची CIBILच्या कारणावरून अडवणूक होऊ नये. प्रत्येक शाखेला यासंदर्भात लिखित सूचना देण्याचे आदेश देण्यात आले असून, बैठकीत उपस्थित RBI अधिकाऱ्यांनीही या भूमिकेला दुजोरा दिला.

### AI आधारित 'महाविस्तार 2.0' ॲप शेतकऱ्यांच्या मदतीला

शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन मिळावं यासाठी 'महाविस्तार 2.0' या नव्या ॲपची सुधारित आवृत्ती सुरू करण्यात आली आहे. या ॲपच्या माध्यमातून शेतकरी पिकं, हवामान, कीड, सिंचन किंवा सरकारी योजनांबाबत प्रश्न विचारू शकणार असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित उत्तरं त्यांना त्वरित मिळणार आहेत.

### कमी पावसाची शक्यता

यंदाच्या खरीप हंगामावर हवामानाचं मोठं संकट ओढवण्याची शक्यता सरकारने मान्य केली आहे. अल निनोच्या प्रभावामुळे पाऊस सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम विदर्भात परिस्थिती अधिक गंभीर असू शकते, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. जूनमध्ये कमी पाऊस, जुलैमध्ये त्याहून कमी आणि ऑगस्टमध्येही सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान राहू शकतं, असा अंदाज आहे. यामुळे जलसंधारण, कमी पाण्यात येणारी पिकं, पीक व्यवस्थापन आणि सिंचनाचा काटकसरीने वापर यावर भर देण्याच्या सूचना जिल्हास्तरावर देण्यात आल्या आहेत.

# रेल्वे भरती आंदोलन प्रकरणातील गुन्ह्यातून राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता

महाईन्यूज । मुंबई

**२००८ मधील रेल्वे भरती आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या गुन्ह्यातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची ठाणे सत्र न्यायालयाने आज (दि. २१) निर्दोष मुक्तता केली. सरकारी पक्षाला न्यायालयात ठोस पुरावे सादर करता न आल्याने न्यायालयाने हा निर्णय दिला.**



२००८ मध्ये झालेल्या रेल्वे भरतीदरम्यान मनसेच्या वतीने परप्रांतीय उमेदवारांविरोधात उग्र आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांना कथितरीत्या चिथावणी दिल्याचा आरोप राज ठाकरे यांच्यावर ठेवण्यात आला होता. याप्रकरणी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाला राज ठाकरे यांच्यावरील गुन्हा सिद्ध करता आला नाही, तसेच त्यांचा या गुन्ह्यातील थेट सहभाग स्पष्ट होईल असे कोणतेही ठोस पुरावे न्यायालयात मांडता आले नाहीत. त्यामुळे पुराव्याभावी राज ठाकरे यांना या प्रकरणातून निर्दोष मुक्त करत असल्याचे ठाणे सत्र न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले.

निकालानंतर राज ठाकरे यांनी माध्यमांशी बोलण्यास नकार दिला. न्यायालयाबाहेर मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळे ते म्हणाले की, "राज ठाकरे यांना चुकीच्या पद्धतीने आरोपी करण्यात आले होते. आज त्यांच्यासह सात आरोपींची २० वर्षांनी निर्दोष मुक्तता झाली आहे. गुन्हा घडला तेव्हा राज ठाकरे नाशिकला होते. महाराष्ट्रातील तरूणांनी एकत्र येऊन आंदोलन केले होते. २००८ ला गुन्हा घडला आणि २०१३ ला राज ठाकरे यांची चौकशी सुरू झाली होती. त्यामुळे जाणीवपूर्वक त्यांना यामध्ये ओवल होते," असे जाधव यांनी सांगितले. ठाणे सत्र न्यायालयाच्या या निर्णयानंतर मनसे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. न्यायालयाबाहेर समर्थकांनी घोषणाबाजी करत राज ठाकरे यांच्या समर्थनात जल्लोष केला. दरम्यान, या निकालामुळे २००८ मधील आंदोलनाशी संबंधित चर्चांना पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात उधाण आले आहे.

### अस्वलाच्या अंगावरचा एक केस कमी झाला

निकाल दिल्यानंतर राज ठाकरेंना कोर्ट म्हणाले की, या संपूर्ण खटल्याची प्रक्रिया मराठीत झाली. मराठीतच सुनावणी झाली आणि निकालही मराठीतच देणार आहे, हे सर्वात आनंदाची गोष्ट होती, असे अविनाश जाधव म्हणाले. "ही सर्वात मोठी केस होती. त्यातून आज राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता झाली. निकालानंतर बाहेर येताना अस्वलाच्या अंगावरचा एक केस कमी झाला, असे राज ठाकरे म्हणाल्याचे अविनाश जाधव यांनी सांगितले.

# डोनाल्ड ट्रम्प अन् नेतान्याहू यांच्यात मतभेद?

## नेतान्याहू यांनी इराणबाबत अधिक कठोर लष्करी कारवाईच्या भूमिकेवर दिला जोर

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिका-इराण युद्धाबाबत जवळपास दोन महिन्यांच्या कालावधीत देखील कोणताही तोडगा निघालेला नाही. सध्या दोन्ही देशात युद्धविरामाची घोषणा करण्यात आलेली असली तरी युद्ध पूर्णपणे संपलेलं नाही. मध्य पूर्वेत अद्यापही मोठ्या प्रमाणात तणाव आहे. या तणावामुळे होर्मुझची सामुद्रधुनीमधून होणाऱ्या जागतिक व्यापाराला मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत.**



त्यामुळे याचा परिणाम जगातील अनेक देशांवर होत आहे. अमेरिका आणि इराणमध्ये शांतता करार करण्यासाठी पाकिस्तानच्या माध्यमातून चर्चाही पार पडल्या. मात्र, त्या चर्चेतून कोणताही ठोस मार्ग निघाला नाही. त्यानंतर आता अमेरिका आणि इराणमध्ये युद्ध संपवण्याच्या अनुषंगाने शांतता कराराबाबत हालचाली सुरू आहेत. यातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देखील इराण युद्ध संपवण्याचे संकेत दिले आहेत. आम्ही इराणकडून शंभर टक्के योग्य उत्तरांची वाट पाहत असल्याचं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

या सर्व घडामोडी घडत असतानाच आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. इराण युद्धावरून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे प्रमुख बिन्यामिन नेतान्याहू यांच्यात मतभेद निर्माण झाले आहेत. डोनाल्ड ट्रम्प हे इराणबरोबर शांतता करार करण्यासाठी आग्रही आहेत, तर बिन्यामिन नेतान्याहू यांच्या मते इस्रायल आणि अमेरिकेने इराणविरुद्ध लष्करी कारवाई पुन्हा तीव्र करावी अशी त्यांची इच्छा आहे. दरम्यान, यावरून डोनाल्ड ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यात मतभेद झाल्याचं वृत्त सूत्रांच्या हवाल्याने ॲक्सिऑसने दिलं आहे.

डोनाल्ड ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यातील फोनवरील संभाषणानंतर बेंजामिन नेतान्याहू यांच्या प्रतिक्रियेचं वर्णन करताना सूत्रांच्या मते नेतान्याहू हे खूप अस्वस्थ होते. यावेळी ट्रम्प यांनी इराणबरोबर अजूनही करार होऊ शकतो अशी आशा व्यक्त केली. तसेच वाटाघाटी अयशस्वी झाल्यास लष्करी हल्ल्यांचा पर्यायही उपलब्ध असल्याचं स्पष्ट केलं. मात्र, नेतान्याहू यांनी इराणबाबत अधिक कठोर लष्करी कारवाईच्या भूमिकेवर जोर दिला.

मिळालेल्या माहितीनुसार, नेतान्याहू हे इराणबरोबर वाटाघाटी करण्याबाबत इच्छुक नाहीत, त्यांच्या मतानुसार, तेहरानची लष्करी व पायाभूत संरचना आणखी कमकुवत करण्यासाठी इस्रायल आणि अमेरिकेने इराणविरुद्ध लष्करी कारवाई पुन्हा सुरू करावी. सीएनएनच्या एका वृत्तानुसार, डोनाल्ड ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यात फोनवरून जवळपास तासभर झालेल्या संभाषणादरम्यान नेतान्याहू यांनी ट्रम्प यांना सांगितलं की, इराणवरील नियोजित हल्ले पुढे ढकलणं ही एक चूक होती. तसेच नेतान्याहू यांनी इराणवर लष्करी कारवाई सुरू ठेवण्यावर जोर दिला. यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी नेतान्याहू यांना कळवलं होतं की, 'ऑपरेशन स्लेजहॅमर' नावाच्या प्रस्तावित मोहिमेअंतर्गत अमेरिका इराणवर हल्ले करेल. मात्र, कतार, सौदी अरेबिया आणि यूएईसह आखाती मित्र राष्ट्रांच्या विनंतीनंतर एका दिवसांतच ट्रम्प यांनी हे हल्ले थांबवले होते.

### काय चर्चा झाली?

डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतान्याहू यांच्यात मंगळवारी इराणबाबत राजनैतिक संबंध पुन्हा सुरू करण्याच्या प्रयत्नांबाबत फोनवरून चर्चा झाली. यावेळी इराणबरोबरील वाटाघाटी पुढे चालू ठेवायच्या की पुन्हा लष्करी कारवाईकडे वळायचं? यावरून ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यात मतभेद झाले. वृत्तानुसार, ट्रम्प आणि नेतान्याहू यांनी कतार आणि पाकिस्तानने इतर प्रादेशिक मध्यस्थांच्या पाठिंब्याने तयार केलेल्या सुधारित शांतता प्रस्तावावर देखील चर्चा केली. अमेरिका आणि इराण यांच्यातील दरी कमी करणं हा या प्रस्तावाचा उद्देश असल्याचं सांगितलं जातं.

---

# 'कॉकरोच जनता पार्टी'चं X अकाउंट भारतात ब्लॉक; BJPला मागे टाकल्यानंतर मोठी कारवाई

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**सोशल मीडियावर प्रचंड चर्चेत असलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी' (CJP) संदर्भात मोठी घडामोड समोर आली आहे. इन्स्टाग्रामवर BJP च्या अधिकृत अकाउंटपेक्षा जास्त फॉलोअर्स मिळवल्यानंतर काही तासांतच कॉकरोच जनता पार्टीचं X (पूर्वीचं TWITTER) अकाउंट भारतात ब्लॉक करण्यात आल्याचा दावा केला जात आहे.**




CJP चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियावर स्क्रीनशॉट शेअर करत, "अपेक्षेप्रमाणे, कॉकरोच जनता पार्टीचं अकाउंट भारतात ब्लॉक करण्यात आलं आहे," अशी प्रतिक्रिया दिली. या पोस्टनंतर सोशल मीडियावर चर्चेला उधाण आलं. X कडून किंवा संबंधित अधिकृत संस्थांकडून याबाबत कोणतंही अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेलं नाही.

'कॉकरोच जनता पार्टी' हा पारंपरिक राजकीय पक्ष नसून व्यंग, मीम्स आणि डिजिटल आंदोलनाचं मिश्रण असलेली सोशल मीडिया मोहीम आहे. बेरोजगारी, पेपरफुटी, राजकीय वातावरण आणि तरुणांमधील नाराजी या मुद्द्यांवर ही मोहीम जोरदार चर्चेत आली.

स्वतःला "तरुणांची, तरुणांसाठी आणि तरुणांनी उभारलेली चळवळ" असं सांगणाऱ्या या मोहिमेने काही दिवसांतच मोठा डिजिटल प्रभाव निर्माण केला आहे.

या मोहिमेची सुरुवात एका वादग्रस्त वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर झाली असल्याचं बोललं जात आहे. बेरोजगार तरुणांबाबत करण्यात आलेल्या कथित टिप्पणीवरून सोशल मीडियावर संताप व्यक्त होत असताना या व्यंगात्मक मोहिमेचा जन्म झाला. आता X अकाउंट ब्लॉक झाल्याच्या दाव्यानंतर हा ट्रेंड आणखी वेगाने चर्चेत आला असून, सोशल मीडिया आणि राजकीय वर्तुळात यावर जोरदार चर्चा सुरू आहे.

दरम्यान, अनेक सोशल मीडिया युजर्सनी अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि डिजिटल सेन्सॉरशिपचा मुद्दा उपस्थित करत या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. काहींनी ही कारवाई राजकीय दबावातून झाल्याचा आरोप केला, तर काहींनी X च्या नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे अकाउंटवर निर्बंध आले असावेत, असा अंदाज व्यक्त केला.

### Instagram वर BJPला मागे टाकल्याचा दावा

काही अहवालांनुसार, CJP ने INSTAGRAM वर 10 दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स मिळवत भाजपच्या अधिकृत अकाउंटला फॉलोअर्सच्या बाबतीत मागे टाकलं. BJP च्या INSTAGRAM अकाउंटवर सुमारे 12 दशलक्ष फॉलोअर्स असल्याचं सांगितलं जात आहे. या अचानक वाढलेल्या लोकप्रियतेमुळे 'कॉकरोच जनता पार्टी' इंटरनेटवरील चर्चेचा विषय ठरत आहे. या प्रकरणामुळे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील कंटेंट नियंत्रण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यावरील चर्चा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. तरुणांमध्ये या मोहिमेबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

# जान्हवीवर शिखर फिदा



अभिनेता राम चरण आणि अभिनेत्री जान्हवी कपूर यांच्या आगामी 'पेड्डी' या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज होताच सोशल मीडियावर जबरदस्त चर्चा सुरू झाली आहे. दमदार ॲक्शन, भावनिक कथा आणि वेगळ्या लूकमुळे हा ट्रेलर प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. मात्र या सगळ्यात सर्वाधिक लक्ष वेधून घेतलं ते जान्हवी कपूरच्या भूमिकेने. ट्रेलरमध्ये ती खूप आत्मविश्वासपूर्ण आणि ताकदवान भूमिकेत दिसत असून चाहत्यांकडून तिचं मोठं कौतुक होत आहे. ट्रेलर रिलीज झाल्यानंतर जान्हवी कपूरचा कथित बॉयफ्रेंड शिखर पहाडियानेही तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. त्याने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर 'पेड्डी'चा ट्रेलर शेअर करत जान्हवीला "रिअल आणि रील लाइफ डॉन" असं म्हटलं. त्याने लिहिलं की, "जान्हवी कपूर खरी आणि पडद्यावरही जबरदस्त आहे. राम चरणही अफलातून दिसत आहेत. तुमच्या दोघांची फिल्म पाहण्याची उत्सुकता आता आवरत नाही." शिखरच्या या पोस्टनंतर जान्हवीनेही त्याची स्टोरी रिपोस्ट केली आणि त्यासोबत हार्ट इमोजी शेअर करत आपली प्रतिक्रिया दिली. त्यामुळे पुन्हा एकदा या दोघांच्या नात्याची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. जान्हवी कपूर आणि शिखर पहाडिया यांचं नाव गेल्या काही वर्षांपासून एकत्र जोडलं जात आहे. दोघे अनेकदा सुट्ट्यांमध्ये, मंदिर दर्शनाला किंवा कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसले आहेत. मात्र त्यांनी अद्याप अधिकृतपणे त्यांच्या नात्याची घोषणा केलेली नाही. तरीही सोशल मीडियावर आणि बॉलिवूड वर्तुळात हे दोघे रिलेशनशिपमध्ये असल्याची चर्चा कायम असते. 'पेड्डी' या चित्रपटात राम चरण आणि जान्हवी कपूरसोबत दिव्येंदू शर्मा, शिव राजकुमार, जगपती बाबू आणि बोमन इराणी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. चित्रपटाचं संगीत प्रसिद्ध संगीतकार ए. आर. रहमान यांनी दिलं आहे. त्यामुळे या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.






# मंजुळा सगळ्यांची झोप उडवणार!

भयपटात कॉमेडीची झलक पाहायला मिळत असल्याने प्रेक्षकांमध्ये अशा चित्रपटाबद्दल एक वेगळीच उत्सुकता पाहायला मिळते. स्त्री या हिंदी चित्रपटानंतर आता अनेक भयपटांमध्ये कॉमेडीचा सुयोग्य मेळ घातल्याचे बघायला मिळत आहे. मराठी चित्रपटांमध्ये देखील याचा प्रभावीपणे वापर केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून ज्या चित्रपटाची चर्चा होती, अखेर त्या 'तुंबाडची मुंजळा'चा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटाची कथा कोकणातील असल्याने तिथल्याच भाषेचा वापर संवादात करण्यात आला आहे. हॉररसोबत विनोदाची फोडणी असल्यामुळे एक वेगळाच अनुभव देणारा तुंबाडची मुंजळा हा चित्रपट असणार असल्याचे बोलले जात आहे. हा चित्रपट ५ जून २०२६ रोजी राज्यभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# एकदा चूक झाली तर.. रकुल प्रीत सिंहचे वक्तव्य



अभिनेत्री रकुल प्रीत सिंह सध्या तिच्या 'पति पत्नी और वो २' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर चांगला प्रतिसाद मिळत असतानाच रकुलने नात्यातील फसवणूक आणि माफी यावर स्पष्टपणे आपले मत मांडले आहे. तिच्या या वक्तव्याची सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू झाली आहे. एका मुलाखतीदरम्यान रकुलला विचारण्यात आले की, नात्यातील धोका किंवा बेवफाई कधी स्वीकारता येऊ शकते का? यावर तिने सुरुवातीलाच ठामपणे "नाही" असे उत्तर दिले. तिच्या मते, नात्यात फसवणूक योग्य नाही. मात्र त्यानंतर तिने माफीबाबत वेगळा दृष्टिकोन मांडला. रकुल म्हणाली की, "एखाद्याकडून आयुष्यात एकदा चूक होऊ शकते. आयुष्य खूप मोठं आहे. एका चुकीसाठी कायम एखाद्याला दोष देत राहणं योग्य नाही." मात्र तिने हेही स्पष्ट केले की, ती तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलत नव्हती. तिने सांगितले की, जर एखाद्याला माफ करायचे असेल, तर ती चूक विसरण्याचाही प्रयत्न केला पाहिजे. नाहीतर नातं पुढे नेणं कठीण होतं. या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा तिच्या आणि तिचे पती जॅकी भगनानी यांच्या नात्याची चर्चा रंगली आहे. काही दिवसांपूर्वी जॅकी भगनानी यांनी त्यांच्या लग्नाला "सिचुएशनशिप" असे म्हटले होते. या शब्दामुळे सोशल मीडियावर अनेक प्रतिक्रिया उमटल्या होत्या. अनेकांनी त्याचा चुकीचा अर्थ काढला आणि दोघांच्या नात्याबद्दल चर्चा सुरू झाली. यानंतर रकुलने एक मजेशीर व्हिडिओ शेअर करत या चर्चेला हलक्याफुलक्या पद्धतीने उत्तर दिले. त्या व्हिडिओमध्ये ती जॅकीला कान पकडायला सांगताना दिसली. मजेत ती म्हणाली, "आपण मिलेनियल्स आहोत, जेन-झी बनायची गरज नाही असं सांगितलं होतं ना?" त्यावर जॅकीने हसत "सॉरी" म्हटले. हा व्हिडिओ चाहत्यांना खूप आवडला. वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाल्यास, रकुल प्रीत सिंह नुकतीच आयुष्मान खुराना, वामिका गब्बी आणि सारा अली खान यांच्यासोबत 'पति पत्नी और वो २' या चित्रपटात दिसली. या चित्रपटाने आतापर्यंत सुमारे २५ कोटी रुपयांपेक्षा अधिक कमाई केली आहे.

# हार्दिकवर BCCIची मोठी कारवाई!

## मैदानावर राग व्यक्त करणं कॅप्टनला पडलं महागात

**महाईन्यूज । मुंबई**

**हार्दिक पंड्याच्या नेतृत्त्वाखाली मुंबई इंडियन्सला केकेआरविरूद्ध सामन्यात पराभवाला सामोरं जावं लागलं. ईडन गार्डन्सच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात केकेआरने मुंबईवर ४ विकेट्सने विजय मिळवला. या विजयासह केकेआरचा संघ प्लेऑफच्या शर्यतीत कायम असून त्यांनी पंजाब किंग्सची बरोबरी केली आहे. पण या सामन्यानंतर आता बीसीसीआयने हार्दिक पंड्यावर कारवाई केली आहे.**



कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याला दुहेरी धक्का बसला. त्याच्या कर्णधारपदाखाली संघाचा पराभव तर झालाच, पण सामन्यादरम्यान झालेल्या एका मोठ्या चुकीबद्दल त्याला बीसीसीआयच्या कारवाईलाही सामोरं जावं लागलं. शिक्षा म्हणून बीसीसीआयने मुंबई इंडियन्सच्या कर्णधारावर दंड आकारला आहे, ज्यामध्ये त्याच्या सामना शुल्कातून १० टक्के दंड म्हणून कपात केली. याशिवाय हार्दिकला एक डिमेरिट पॉईंटही देण्यात आला आहे.

हार्दिक पंड्यावर कारवाई करण्यामागचं कारण म्हणजे त्याने केकेआरच्या डावाच्या १०व्या षटकात केलेली चूक. षटकाच्या चौथ्या चेंडूवर, हार्दिक पंड्याने रन-अपसाठी परतताना बेल्स पाडून आपली नाराजी व्यक्त केली. या चुकीबद्दल त्याला दंड ठोठावण्यात आला आहे. सामन्यादरम्यान केलेल्या कृतीबद्दल हार्दिक पंड्याला आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.२ अंतर्गत दोषी ठरवण्यात आलं आहे. हे कलम सामन्यादरम्यान 'क्रिकेटचे साहित्य किंवा कपडे, मैदानातील उपकरणे किंवा वस्तूंचा गैरवापर' करण्यासंबंधीच्या आहे. त्याने सामनाधिकारी राजीव सेठ यांच्यासमोर आपली चूक कबूल केली असून, या प्रकरणात पुढील कारवाईची आवश्यकता नाही.




# BCCIने जाहीर केलेल्या भारतीय संघात गुजरात टायटन्सचे ७ खेळाडू

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएल २०२६ स्पर्धा सध्या शेवटच्या टप्प्यात आहे. या स्पर्धेतील प्लेऑफमध्ये प्रवेश करणारे ३ संघ ठरले आहेत. तर १ स्थानासाठी ३ संघांमध्ये चुरशीची लढत सुरू आहे. या स्पर्धेचा अंतिम सामना ३१ रोजी खेळवला जाणार आहे. ही मालिका झाल्यानंतर भारत आणि अफगाणिस्तान हे दोन्ही संघ वनडे आणि कसोटी मालिकेसाठी आमनेसामने येणार आहेत. ६ जूनपासून दोन्ही संघांमध्ये एकमेव कसोटी सामन्याचा थरार रंगणार आहे. या मालिकेसाठी बीसीसीआयकडून भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघातील बहुतांश खेळाडू हे गुजरात टायटन्स संघातील आहेत.**



अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या १५ पैकी ७ खेळाडू हे गुजरात टायटन्स संघाचे आहेत. गुजरात टायटन्सचा कर्णधार शुबमन गिल हा भारतीय कसोटी संघाचा कर्णधार आहे. यासह साई सुदर्शन, वॉशिंग्टन सुंदर , प्रसिध कृष्णा, मोहम्मद सिराज, मानव सुथार आणि गुरनुर ब्रार यांचा समावेश आहे.

यासह वनडे मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात देखील गुजरात टायटन्स संघाचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. या संघात गुजरातच्या ४ खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. शुबमन गिल हा वनडे संघाचा देखील कर्णधार आहे. यासह प्रसिध कृष्णा, वॉशिंग्टन सुंदर आणि गुरनुर ब्रार या खेळाडूंना संधी देण्यात आली आहे.

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात होणारा कसोटी सामना ६ जूनपासून सुरू होणार आहे. हा सामना न्यू चंदिगडमध्ये खेळवला जाणार आहे. तर वनडे मालिकेतील सामने १४,१७ आणि २० जून रोजी खेळवले जाणार आहेत.

### असा आहे भारतीय संघ :

शुबमन गिल (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, केएल राहुल (उपकर्णधार) साई सुदर्शन, ऋषभ पंत, देवदत्त पडिक्कल, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा, मानव सुथार, गुरनूर ब्रार, हर्ष दुबे, ध्रुव जुरेल.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
दि. 22 मे 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# नागरिकांच्या सहभागातून जनगणनेला मिळणार गती



**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**जनगणना २०२७ अंतर्गत घरयादी व घरगणनेच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात पिंपरी चिंचवड शहरात १६ मे २०२६ पासून सुरू झाली असून, ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. या मोहिमेदरम्यान नियुक्त प्रगणक नागरिकांच्या घरी भेट देऊन आवश्यक माहिती संकलित करत आहेत. तरी नागरिकांनी प्रगणकांना योग्य व संपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे, तसेच स्व-नोंदणी केलेल्या नागरिकांनी आपला स्वयं नोंदणी क्रमांक उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.**

> जनगणना ही केवळ लोकसंख्येची नोंद नसून, शहराच्या भविष्यातील गरजा ओळखण्याचे प्रभावी माध्यम आहे. नागरिकांनी दिलेली अचूक माहिती ही विकास योजनांच्या योग्य अंमलबजावणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. त्यामुळे प्रत्येकाने सकारात्मक सहभाग घेऊन जनगणना प्रक्रिया यशस्वी करावी.
>
> **– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> घरयादी व घरगणना मोहिमेदरम्यान नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून द्यावी. जनगणनेसाठी दिलेली माहिती पूर्णपणे सुरक्षित ठेवली जाते. नागरिकांच्या सहकार्यामुळेच अचूक माहिती संकलित होऊन शहराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार आहे.
>
> **– सचिन पवार, उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

घरयादी व घरगणना ही जनगणनेतील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, यामध्ये घरांची स्थिती, कुटुंबातील सदस्यांची माहिती आणि उपलब्ध नागरी सुविधांची नोंद केली जाते. या माहितीच्या आधारे शासन विविध विकासकामांचे नियोजन, सुविधा वितरण तसेच सामाजिक कल्याण योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करते त्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि अचूक माहितीमुळे भविष्यातील शहर विकासाला दिशा मिळणार असल्याचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.



# पिंपरी-चिंचवडमध्ये पाईप गॅस जोडणी वेगवान होणार!

## मनपा, MNGL आणि हाऊसिंग फेडरेशनची संयुक्त समन्वय समिती स्थापन!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाईप नॅचरल गॅस (PNG) पायाभूत सुविधांचा विस्तार करणे आणि गॅस कनेक्शन अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) आणि महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (MNGL) यांच्या संयुक्त विद्यमाने ऑटो क्लस्टर येथील व्हीव्हीआयडीओ कॉन्फरन्स हॉलमध्ये एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.**



या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मनपा आयुक्त श्री. विजय सूर्यवंशी होते. बैठकीला एमएनजीएलचे महाव्यवस्थापक (GM), जिल्हा उपनिबंधक (DDR) पुणे, पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीज फेडरेशनचे (PCCHSF) अध्यक्ष श्री. सचिन लोंढे, सचिव सचिन गुणाले, संचालक वैभव चौधरी, अधिकराव दिवेपाटील आणि चिखली-मोशी सोसायट्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी हाऊसिंग फेडरेशनची सक्रिय भागीदारी आणि एकतेचे विशेष कौतुक केले.

ऊर्जा सुरक्षेसाठी देशांतर्गत उत्पादित नैसर्गिक वायूचा जास्तीत जास्त वापर करण्याचे माननीय पंतप्रधानांचे धोरण असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. आखाती देशांमधील भू-राजकीय अस्थिरतेमुळे भारताच्या आर्थिक स्थिरतेला थेट धोका निर्माण होतो. पीएनजीच्या विस्तारामुळे एलपीजी सिलेंडरवरचे अवलंबित्व कमी होईल आणि परकीय चलनाचा (यूएस डॉलर्स) देशाबाहेर जाणारा ओघ थांबून भारतीय अर्थव्यवस्था मजबूत होईल, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

एमएनजीएलच्या महाव्यवस्थापकांनी सांगितले की, प्रत्येक गॅस कनेक्शनसाठी सुरुवातीला जरी २६,००० रुपये एवढा पायाभूत खर्च येत असला, तरी ग्राहक आणि देश या दोघांसाठी याचे दीर्घकालीन आर्थिक आणि पर्यावरणीय फायदे मोठे आहेत.

बैठकीत हाऊसिंग फेडरेशनने मालमत्ता करातील सवलतींच्या मुद्द्यावरून प्रशासनाला थेट धारेवर धरले. मनपाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन गेल्या काही वर्षांत सोसायट्यांनी लाखो रुपये खर्च करून घनकचरा व्यवस्थापन (SWM), सौर ऊर्जा (Solar), सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) आणि ईव्ही चार्जिंग स्टेशन्स उभारले. मात्र, स्वतःच्या पैशाने शहराच्या पर्यावरण रक्षणात योगदान देऊनही नागरिकांना करात १% देखील सवलत मिळाली नाही, तसेच नियमित कर भरूनही पुरेसा पाणीपुरवठा केला जात नसल्याबद्दल फेडरेशनने तीव्र असंतोष व्यक्त केला.

फेडरेशनची ही टीका रास्त असल्याचे मान्य करत, मनपा आयुक्त श्री. विजय सूर्यवंशी यांनी ज्या सोसायट्यांनी हे ग्रीन प्रोजेक्ट्स पूर्ण केले आहेत, त्यांची प्रमाणित व लेखापरीक्षित (Audited) यादी तात्काळ आयुक्त कार्यालयाकडे सादर करण्याचे आदेश फेडरेशनला दिले. या कागदपत्रांची पडताळणी करून मालमत्ता करातील प्रलंबित सवलतींचे वाद तातडीने निकाली काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

### फेडरेशनचे प्रश्न आणि तांत्रिक तोडगे:

- संयुक्त समन्वय समितीची स्थापना: प्रलंबित गॅस जोडणीचे प्रश्न सोडवण्यासाठी मनपा, एमएनजीएल आणि हाऊसिंग फेडरेशन (PCCHSF) यांच्या प्रतिनिधींची एक संयुक्त समन्वय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- नवीन प्रकल्पांना पीएनजी बंधनकारक करण्याची मागणी: फेडरेशनचे अध्यक्ष सचिन लोंढे यांनी मनपाने नवीन गृहनिर्माण प्रकल्पांना मंजुरी देतानाच पीएनजी यंत्रणा (Piped Gas System) बंधनकारक करावी, असा प्रस्ताव मांडला.
- कुशल कामगारांची टंचाई: कॉपर आणि ब्रास पाईपलाईन बसवण्यासाठी प्रशिक्षित प्लंबरची कमतरता असल्याचे एमएनजीएलने मान्य केले. यावर तोडगा म्हणून फेडरेशनचे संचालक वैभव चौधरी यांनी व्यावसायिक एअर कंडिशनिंग (AC) व्हेंडर्सकडील कुशल पाईप-फिटर्सची मदत घेण्याचा व्यावहारिक सल्ला दिला आणि या दोन्ही घटकांमध्ये समन्वय घडवून आणण्याची जबाबदारी घेतली.
- अंतर्गत पाईपलाईन सामायिकीकरण (Right of Way): मुख्य रस्त्यांवरील रस्ते खोदणे टाळण्यासाठी शेजारील सोसायट्यांनी आपापल्या अंतर्गत भागातून पाईपलाईन नेण्यास (Right of Way) सहकार्य करावे, असे आवाहन एमएनजीएलतर्फे करण्यात आले.

देशाच्या आर्थिक हितासाठी घराघरांपर्यंत पाईप गॅस पोहोचवण्याच्या मोहिमेला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन हाऊसिंग फेडरेशनने (PCCHSF) दिले आहे. मात्र, मनपाने प्रलंबित पीएनजी जोडण्या तातडीने पूर्ण कराव्यात आणि मालमत्ता करातील थकीत सवलती त्वरित लागू कराव्यात, अशी ठाम मागणीही फेडरेशनने शेवटी केली.

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठक संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**बकरी ईदच्या अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधून नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये कोणत्याही त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. तसेच या सणाचे महत्त्व लक्षात घेता नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करून नियमांचे पालन करावे, असे आवाहन देखील त्यांनी केले.**



बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महापालिका प्रशासन, पोलीस विभाग तसेच शहरातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता प्रेरणा सिनकर, उप आयुक्त संदीप खोत, अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता माणिक चव्हाण, सुनीलदत्त नरोटे, विजयसिंह भोसले, महेश कावळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरूण दगडे, सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्यासह पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे सहाय्यक पोलीस आयुक्त प्रविण मोरे, पोलीस निरीक्षक भोजराज मिसाळ, महेंद्र कदम तसेच कुरेशी जमात व्यापारी संघटनेचे युसूफ कुरेशी, गफूर कुरेशी, जमील कुरेशी, शकिल कुरेशी, मौलाना तनवीर, मौलाना फल्जेहक, सबिर कुरेशी, करीम कुरेशी, अकबर कुरेशी, तायपाज कुरेशी, ईर्शाद कुरेशी, शफिक काझी, ऐफाज कुरेशी आदी उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने कुर्बानीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तात्पुरत्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये पत्राशेड, मंडप, पुरेसा पाणीपुरवठा, मोबाईल टॉयलेट व्हॅन, स्वच्छतेसाठी आवश्यक मनुष्यबळ तसेच वेस्ट संकलनासाठी स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

कुर्बानीसाठी आणण्यात येणाऱ्या जनावरांच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्र जागा, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच अतिरिक्त पाणीपुरवठ्यासाठी टँकर आणि हौदांची व्यवस्था करण्यात येणार आहे. कुर्बानीनंतर निर्माण होणारा कचरा व वेस्ट तात्काळ उचलण्यासाठी विशेष पथके कार्यरत राहणार असून परिसरात स्वच्छता राखण्यावर भर देण्यात येणार आहे. याशिवाय, सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. कुर्बानीसाठी मागील वर्षीप्रमाणे नेहरू नगर डॉक पॉइंट येथील जागा निश्चित करण्यात आल्याची माहिती उप आयुक्त संदीप खोत यांनी यावेळी दिली.

# हॉस्पिटॅलिटी अन् एअरलाइन्स क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी

## IIBM कॉलेजच्या विभागप्रमुख प्रतिक्षा डफळ यांचे मुलींना सक्षम होण्याचे आवाहन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**“आजच्या आधुनिक युगात विद्यार्थिनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवत आहेत. जर तुमची उंची चांगली असेल, संभाषण कौशल्य उत्तम असेल आणि स्वभावात धाडस असेल, तर ‘हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट’ हे क्षेत्र तुमच्यासाठी करिअरचे एक उत्तम व्यासपीठ ठरू शकते. केवळ सुंदर दिसण्यावरच नाही, तर कौशल्याच्या जोरावर ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलीही एअर होस्टेस किंवा यशस्वी बिझनेस वुमन बनून स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभ्या राहू शकतात,” असा विश्वास पुणे येथील IIBM कॉलेजच्या विभागप्रमुख (HOD) कु. प्रतिक्षा डफळ यांनी व्यक्त केला आहे.**



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सक्षम आणि स्वावलंबी बनवणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असून यामध्ये रोजगाराची १००% हमी दिली जाते, अशी माहिती त्यांनी दिली.

हा अभ्यासक्रम पूर्णपणे मान्यताप्राप्त असून संस्थेला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (SPPU), कवी कुलगुरू कालिदास संस्कृत नागपूर विद्यापीठ (KKSU) आणि महाराष्ट्र बोर्डाची (MSBVE) मान्यता आहे. त्यामुळे शासकीय नियमांनुसार सर्व पात्र विद्यार्थी-विद्यार्थिनींना १००% स्कॉलरशिपचा लाभ मिळतो. आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या विद्यार्थ्यांना या शासकीय योजनांच्या माध्यमातून आपले शिक्षण सन्मानाने पूर्ण करता येणार असून, पैशांची अडचण आता शिक्षणात अडथळा ठरणार नाही, असे संस्थेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

सध्याच्या काळात पर्यटन (Tourism), एअरलाईन, हॉटेल इंडस्ट्री आणि शिप-क्रूझ लाईन इंडस्ट्रीचा विकास अत्यंत वेगाने होत आहे. या क्षेत्रात उत्तम व्यक्तिमत्त्व आणि धाडसाला मोठी मागणी आहे. ज्या विद्यार्थ्यांना भविष्यात स्वतःचे नाव कमवायचे आहे, अशांसाठी हा कौशल्य-आधारित अभ्यासक्रम स्वप्नपूर्तीचे माध्यम ठरत आहे.

### पुस्तकी ज्ञानासोबतच स्वसंरक्षणाचे धडे

या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान दिले जात नाही, तर भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज केले जाते. अभ्यासक्रमासोबतच संस्थेमध्ये विद्यार्थ्यांसाठी खालील विशेष प्रशिक्षणे दिली जातात:
सेल्फ डिफेन्स (SELF DEFENSE): मुलींच्या सुरक्षेसाठी आत्मसंरक्षणाचे विशेष धडे.
आरोग्य व योगा (HEALTH & YOGA): शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी विशेष वर्ग.
फिटनेस मार्गदर्शन: व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी बनवण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन.

> “अशिक्षित पालक किंवा हलाखीची आर्थिक परिस्थिती या कारणांमुळे अनेक मुलींची वयाच्या अवघ्या २०-२२ व्या वर्षी लग्ने केली जातात. परंतु, प्रत्येक मुलीने लग्नाचा निर्णय घेण्यापूर्वी किमान १ ते २ वर्षे तरी जॉब केला पाहिजे. परिस्थिती कशीही असो, आपण आपल्या पायावर सक्षमपणे उभे राहिलेच पाहिजे. विद्यार्थ्यांनी स्वतः चुकीच्या मार्गाला न जाता मोठे ध्येय गाठायचे ठरवले, तर कोणीही त्यांना मागे खेचू शकणार नाही.
>
> **- कु. प्रतिक्षा डफळ, विभागप्रमुख (HOD), IIBM कॉलेज, चिखली पुणे.**

# ‘पवने’चे पाणी पिण्याअयोग्य, बंदिस्त जलवाहिनीबाबत तोडगा काढा; खा. श्रीरंग बारणे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरासाठी पाणी उचलण्यात येत असलेल्या पवना नदीमध्ये मैलामिश्रित, रसायनमिश्रित पाणी सोडले जाते. जनावारांचे मांसही नदीपात्रात आढळत आहे. नदीतील पाणी अतिशय दूषित असून पिण्यायोग्य नसल्याचा रिपोर्ट प्रयोगशाळेने दिला आहे. हे पाणी पिल्याने नागरिकांना विविध आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प मार्गी लागणे अतिशय आवश्यक आहे. याबाबत स्थानिक नागरिक, आजी-माजी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन तोडगा काढण्याची मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी राज्य सरकारकडे केली आहे.**



याबाबत खासदार बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. शहरातील पाण्याची परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. गेल्या काही वर्षांपासून रखडलेला पवना बंदिस्त प्रकल्प जलवाहिनी मार्गी लावण्यासाठी सर्वपक्षीय बैठक घेण्याची विनंती केली आहे. मावळातील स्थानिक नागरिक, शेतकरी यांचे काही प्रश्न आहेत. ते जाणून घ्यावेत. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, आंदोलक, विविध संघटनांनाबरोबर संयुक्त बैठक घेऊन मार्ग काढावा, असे खासदार बारणे म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांनाही याबाबतचे निवेदन दिले आहे.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३२ लाखांवर पोहोचली आहे. शहर चारही बाजूने विस्तारत असून झपाट्याने लोकसंख्या वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येला पाणी अपुरे पडत आहे. महापालिका पवना नदीतील रावेत बंधाऱ्यातून एका दिवसाला ५५० एमएलडी पाणी उचलत आहे. हे पाणी अतिशय अशुद्ध आहे. नदीमध्ये मैलामिश्रित, रसायनमिश्रित पाणी सोडले जाते. जनावारांचे मांसही नदीपात्रात आढळत आहे. त्यामुळे पाणी पिण्यायोग्य राहिले नाही. प्रयोगशाळेनीही तसा अहवाल दिला आहे. पवना नदी मृत झाली आहे.

आंद्रा धरणातील पाणी इंद्रायणी नदीतील निघोजे बंधाऱ्यातून उचलले जाते. हे पाणीही अतिशय अशुद्ध आहे. दोन्ही नदीतून उचलण्यात येणारे पाणी अशुद्ध आहे. हे पिण्यायोग्य राहिले नाही. हे पाणी शुद्ध करुन नागरिकांना वितरित केले जाते. परंतु, हे पाणी पिल्याने नागरिकांना विविध वैद्यकीय आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे पाणी पिल्याने जीवितहानीही होऊ शकते. नागरिकांच्या भावना तीव्र आहेत. त्यासाठी पवना बंदिस्त जलवाहिनी योजना करणे अतिशय आवश्यक आहे. त्यासाठी बाधित शेतकरी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, विविध संघटनांना विश्वासात घ्यावे. चर्चेतून तोडगा काढावा. बंदिस्त जलवाहिनी झाल्यास शुद्ध आणि वाढीव पाणी उपलब्ध होईल. त्यामुळे नागरिकांना पुरेसे, मुबलक पाणी उपलब्ध होईल. पाणी टंचाईच्या तक्रारींमध्ये घट होईल, असेही खासदार बारणे म्हणाले.

> “पवना नदीतील पाणी अतिशय अशुद्ध आहे. हे पाणी पिण्यायोग्य नाही. त्यासाठी पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प मार्गी लागणे आवश्यक आहे. सर्वांशी सखोल चर्चा करुन यातून तोडगा काढण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.
>
> **– श्रीरंग बारणे, खासदार मावळ**

**PRIYADARSHANI SCHOOL & JR. COLLEGE**
MOSHI

## 43 YEARS OF NURTURING VALUES, EXCELLENCE AND TOMORROW'S LEADERS.



## ADMISSIONS OPEN 2026-27

Nursery to Grade 5

### WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

**+91 9890613333 | +91 9373073077**

**pgosm05@gmail.com** **www.priyadarshanischoolmoshi.in**